| CNR No.MHPU130019872021 | नियमीत दिवाणी दावा क्र.३०७/२०२१ |
| --- | --- |
| | **शांताबाई बबन कटके व इतर<br>वि.<br>मुक्ताबाई लक्ष्मण नाटकर व इतर** |

## निशाणी क्र.५ खालील आदेश
## ( दिनांक १६.०१.२०२६ )

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **वादींचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहेः–**

१. गट नं.३७३ (जुना गट नं.४३१ सर्व्हे नं.१२३/१य) क्षेत्र १हे. ३६ आर + पोटखराब १२ आर पैकी ८ आणे क्षेत्र.

२. गट नं.३७६ (जुना गट नं.४३१ सर्व्हे नं.१२३/१झ) क्षेत्र ००हे. २८ आर + पोटखराब ००हे १ आर पैकी ८ आणे क्षेत्र.

३. गट नं.३९७ (जुना गट नं.४४६ सर्व्हे नं.१२३/१अ) क्षेत्र ००हे. ६३ आर + पोटखराब १७ आर पैकी ८ आणे क्षेत्र.

४. गट नं.५०३ (जुना गट नं.५५२ सर्व्हे नं.१३८/२अ) क्षेत्र १हे. ६५ आर + पोटखराब १९ आर पैकी ८ आणे क्षेत्र.

५. गट नं.३७३ (जुना गट नं.४३१ सर्व्हे नं.१२३/१य) क्षेत्र १हे. ३६ आर + पोटखराब १२ आर पैकी ८ आणे क्षेत्र.

६. गट नं.३७७ (जुना गट नं.४३५) क्षेत्र ००हे. ०४ आर.

७. गट नं.३७५ (जुना गट नं.४३३) क्षेत्र ००हे. ०४ आर.

८. ग्रामपंचायत मिळकत नं.१७९ पैकी निम्मा हिस्सा.

९. ग्रामपंचायत मिळकत नं.४६४ पैकी साळुबाई शिवराम नाटकर यांचा १/३ हिस्सा.

येणेप्रमाणे मिळकत दावा कलम १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे. (या मिळकतींस यापुढे संक्षिप्तरित्या ‘दावा मिळकतीं’ असे संबोधले आहे.)

**३.** दावा मिळकती पैकी ग्रामपंचायत मिळकत क्र.४६४ वगळता इतर मिळकतीं या शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या वडिलार्जित हिश्श्याच्या मिळकतीं आहेत. मूळ पुरुष लक्ष्मण महादू नाटकर यांना शिवराम व दत्तू ही मुले होती. दावा शेत मिळकतींमध्ये शिवराम लक्ष्मण नाटकर यांचा १/२ हिस्सा होता. शिवराम यांना वादी क्र.१, २, मयत जाईबाई म्हणजे वादी क्र.३, ४, १०, ११ व मयत किसन यांची आई आणि मयत गंगुबाई म्हणजे वादी क्र.१२ ते १४ यांची आई या चार मुली होत्या. शिवराम यांना पुत्र संतान नव्हते. मयत किसन यांचे वादी क्र.५ ते ९ हे वारस आहेत. गंगुबाई शंकर खेडेकर या दि.१९.०६.१९९९ रोजी मौजे नायगांव, ता. हवेली, जि. पुणे येथे व जाईबाई तुकाराम घाटे या दि.१८.०५.२०११ रोजी मौजे पठारवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे मयत आहेत. मयत प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.२ व ३ हे लक्ष्मण नाटकर याचे वारस आहेत. शिवराम लक्ष्मण नाटकर हे १९५७ चे सुमारास मयत झाले. त्यांच्या मृत्यूनंतर सातबारापत्रकी त्यांचे वारस म्हणून पत्नी साळुबाई व मुली वादी क्र.१, २, जाईबाई तुकाराम घाटे व गंगूबाई शंकर खेडेकर यांच्या नावाची नोंद फेरफार नं.३१२६ नुसार दि.०९.१२.१९६७ रोजी झाली. त्यानंतर दि.२३.०७.१९७१ रोजी साळुबाई शिवराम नाटकर म्हणजे वादी क्र.१, २ यांची आई व वादी क्र.३ ते १४ यांची आजी हिने तीचे पती शिवराम यांचा भाऊ दत्तू याचा मुलगा लक्ष्मण यास नोंदणीकृत दस्तान्वये दत्तक घेतले. त्यास वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई या संमती देणार म्हणून पक्षकार होत्या. त्यानंतर सन १९८४ च्या सुमारास सदर दत्तकपत्राची नोंद मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या सर्व मिळकतींच्या सातबारासदरी फेरफार नं.५५७ अन्वये झाली. तथापि, नोंद होत असताना दत्तकपुत्र हा सज्ञान होता म्हणून साळुबाई शिवराम नाटकर यांचे व इतर हक्कात असलेल्या मुलीं वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांचे वारस हक्क डावलून कोणतीही नोटीस न देता दत्तकपुत्र शिवराम लक्ष्मण नाटकर याचे एकट्याचे नावची नोंद बेकायदेशीरपणे झाली.

**४.** मालमत्ता क्र.४६४ ही साळुबाई शिवराम नाटकर यांना माहेरकडून वारसाहक्काने आलेली मिळकत असून त्यामध्येही वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांचा वारसहक्क असताना मयत प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२, ३ यांनी स्वतःच्या नावाची नोंद केली आहे. वास्तविक, वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांच्या

नावची नोंद फेरफार नं.५५७ होत असताना मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या मिळकतीस दत्तक बंधू लक्ष्मण शिवराम नाटकर सोबत होणे अपेक्षित असताना महसूल अधिकारी यांच्या संगनमताने सदरची नोंद बेकायदेशीरपणे केली. वादी क्र.१, २ व त्यांच्या बहिणी अशिक्षित व विवाहित असल्यामुळे सदरची बाब त्यांचे निदर्शनास आली नाही. त्यामुळे त्यास हरकत घेणे शक्य झाले नाही. वास्तविक, दत्तकविधान झालेनंतर पूर्वाश्रमीचे लक्ष्मण दत्तू नाटकर यांचा दत्तु लक्ष्मण नाटकर यांच्या हिश्श्यामधील वारसा हक्क संपूष्टात येत असतानाही दत्तु लक्ष्मण नाटकर याचे निधनानंतर फेरफार नं.५०३ अन्वये वारस नोंद होत असताना वारस बाळु, मारुती, पांडुरंग, अंकुश व चंद्रकांत यांच्यासोबत लक्ष्मण शिवराम नाटकर याचेही नावाची नोंद महसूल अभिलेखात झाली. मयत लक्ष्मण शिवराम नाटकर यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा मिळकतीमध्ये कोणतेही हक्क निर्माण केले नव्हते.

**५.** साळुबाई शिवराम नाटकर ही सन १९९० च्या सुमारास मयत झाली. दत्तकपुत्र लक्ष्मण शिवराम नाटकर हा सन १९९२ मध्ये मयत झाला. त्याचे मृत्यूनंतर मयत प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावाची नोंद वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांचे अपरोक्ष फेरफार नं.११९० प्रमाणे झाली. मयत प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी स्वतःच्या नावाची नोंद झालेचा गैरफायदा घेवून लक्ष्मण शिवराम नाटकर यांचे चुलत भाऊ चंद्रकांत, अंकुश, मारुती, पांडुरंग व बाळु दत्तु नाटकर यांचे हक्कात गट नं.५०३ पैकी ४१ आर व पोटखराब ५आर क्षेत्र दस्त क्र.६६१ अन्वये खरेदी दिले. त्यानंतर दि.२३.०२.१९९५ रोजी पुन्हा गट नं.५०३ मधील शिल्लक ४ आणे हिस्सा र.रु.२५,०००/– यास खरेदी दिला. सदर खरेदी दस्तांची नोंद सातबारापत्रकी अनुक्रमे १३३६ व १६५२ अन्वये झाली आहे. सदर दस्तांची माहिती वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांना नव्हती व त्यांचे अशिक्षितपणा व अज्ञानाचा गैरफायदा घेतला होता. त्यामुळे त्यांना सदर दस्ताबाबत कारवाई करणे शक्य झालेले नाही. त्यानंतर खरेदी घेणार बाळु दत्तु नाटकर हा मयत झालेने त्याचे वारस प्रतिवादी क्र.४, २३ ते २५ याचे नावाची नोंद फेरफार नं.२३०० अन्वये सातबारापत्रकी झाली. त्यानंतर खरेदी घेणार चंद्रकांत दत्तु नाटकर हा मयत झालेने त्याचे वारस प्रतिवादी क्र.९ ते ११ व १७ याचे नावाची नोंद फेरफार नं.३१९३ अन्वये सातबारापत्रकी झाली. खरेदी घेणार अंकुश दत्तु नाटकर हा मयत

झालेने त्याचे वारस प्रतिवादी क्र.५ ते ८ याचे नावाची नोंद फेरफार नं.३४५९ अन्वये सातबारापत्रकी झाली. खरेदी घेणार पांडुरंग दत्तु नाटकर हा मयत झालेने त्याचे वारस प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांचे नावाची नोंद फेरफार नं.४७७९ अन्वये सातबारापत्रकी झाली. खरेदी घेणार मारुती दत्तु नाटकर हा मयत झालेने त्याचे वारस प्रतिवादी क्र.१८ ते २२ यांचे नावाची नोंद फेरफार नं.५५१७ अन्वये सातबारापत्रकी झाली.

६. वादी क्र.१ व २ ह्या वयोवृद्ध झाल्या असून त्यांनी जुन २०२१ मध्ये मुलगा रामदास यास मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या मिळकतीबाबत माहिती दिली. त्यानंतर रामदास व वादी क्र.४ ने प्रतिवादी क्र.२ कडे जावून विचारणा केली असता त्यांना नकार मिळाला. त्यानंतर महसुल दस्तऐवज प्राप्त केल्यानंतर दत्तक मुलगा लक्ष्मण शिवराम नाटकर व मयत प्रतिवादी क्र.१ आणि प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे बेकायदेशीर कृत्य निदर्शनास आले. वास्तविक, वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांचा वारसा हक्क असताना तो डावलून महसुल दप्तरी बेकायदेशीर फेरफार नं.५५७ नोंदविला. तसेच, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी बेकायदेशीरपणे वादी क्र.१, २, जाईबाई व गंगुबाई यांचा हक्क डावलून खरेदीखत केले, जे वादींवर बंधनकारक नाहीत. सबब, वादींनी त्यांचा हिस्सा मागितला असता त्यास प्रतिवादी क्र.२ ने नकार दिला. म्हणून प्रस्तुतचा दावा वाटप, मनाई, घोषणा मिळणेकरीता दाखल करणे भाग पडले. प्रथमदर्शनी केस व नुकसानीचे तत्व वादीचे बाजूने आहे. वादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र.२ ते २५ यांनी त्यांचे नावाचे नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीं कोणत्याही तिऱ्हाईत इसमास विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिस वगैरे व बोजा निर्माण करु नये व प्रतिवादी क्र.२, ३ यांनी घर मिळकतीचे स्वरुप बदलू नये, त्यात बांधकाम करु नये असा तुर्तातुर्त आदेश मिळणेची विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अनुक्रमे निशाणी क्र.६२ व ९६ कडे त्यांची लेखी कैफियत व म्हणणे दाखल करुन वादींच्या कथनांना आव्हान दिले आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे म्हणणे एकसारखेच आहे. त्यांचे कथनानुसार, दावा शेत मिळकतीं या लक्ष्मण महादू नाटकर यांचे मालकीच्या होत्या. त्यांना शिवराम व दत्तु ही दोन मुले होती. साळुबाई ही शिवरामची पत्नी होती. साळुबाई शिवराम नाटकर हिला मुलगा नसल्यामुळे तिने प्रतिवादी क्र.२ व ३ चे वडील नामे कै. लक्ष्मण

शिवराम नाटकर यांना दत्तक घेतले होते. सदर दत्तकपत्र करतेवेळी जाईबाई घाटे, गंगुबाई खेडेकर, शांताबाई कटके व सुभद्रा चौधरी यांनी 'त्यांना वडिलांच्या मिळकतीमधील हिस्सा नको, दत्तक भावास द्या' असे म्हणून संमती दिली होती. त्यानुसार लक्ष्मण शिवराम नाटकर यांचे नावाची नोंद सातबारासदरी झाली. त्यानुसार त्यांनी बाळु दत्तु नाटकर, मारुती दत्तु नाटकर, पांडुरंग दत्तु नाटकर, चंद्रकांत दत्तु नाटकर यांना खरेदीखत करुन दिले. सदर खरेदीखताची बाब वादींना त्यावेळी समजली होती. परंतु, त्यांनी मुदतीमध्ये कोणतीही दाद मागितली नाही. त्यामुळे, दावा मुदतबाह्य आहे. वादींचा दावा मिळकतींमध्ये कसलाही हक्क, हितसंबंध व हिस्सा नाही. परंतु, सध्या जमिनींच्या किंमती वाढल्यामुळे काहीतरी रक्कम उकळण्याच्या दृष्ट हेतूने कोणत्याही कारणाविना मानसिक त्रास देण्यासाठी व खर्चात पाडण्यासाठी प्रस्तुतचा खोटा व बेकायदेशीर दावा दाखल केला आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

८. प्रतिवादी क्र.४ ते २५ यांना समन्सची बजावणी होवून देखील हजर न राहिलेने त्यांचेविरुद्ध अर्ज विनाम्हणणे चालविण्यात आला.

९. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास येतात. त्या मुद्यांचे पुढील कारणास्तव मी माझे निष्कर्ष देत आहेः–

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीं त्यांचे हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत करतात काय ? | **होकारार्थी**. |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने असल्याचे वादीं शाबीत करतात काय ? | **होकारार्थी**. |
| ३. | तुर्तातुर्त मनाई न दिल्यास त्यांचे अपरिमित हानी होणार असल्याचे वादीं शाबीत करतात काय ? | **होकारार्थी**. |
| ४. | मागणीनुसार तुर्तातुर्त मनाई मिळण्यास वादीं पात्र आहेत काय ? | **होकारार्थी**. |
| ५. | हुकूम काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**१०.** वादीं–प्रतिवादीं क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीं व प्रतिवादींतर्फे दाखल करणेत आलेल्या कागदपत्रांचा उल्लेख याउपरांत समर्पक ठिकाणी केलेला आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>–**

**११.** वादींनी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी तीन मुद्दे म्हणजेच सकृतदर्शनी केस, सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबीं प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वादींनी कोणतीही बाब लपवून न ठेवता न्यायालयासमोर स्पष्ट हकीकत मांडणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द वाटप, कब्जा, घोषणा व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला असून तुर्तातुर्त मनाई अर्जाद्वारे दावा मिळकतींमध्ये तिऱ्हाईत इसमांचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण करु नयेत, घर मिळकतींचे स्वरुप बदलू नये, त्यात बांधकाम करु नये, मिळकतींचे हस्तांतरण करु नये अगर बोजा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त मनाई मागितली आहे. वादीच्या कथनांवरुन व अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रांवरुन वादींनी प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी समर्थनीय व परिपोषक पुराव्याच्या आधारे सकृतदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? हे पाहणे आवश्यक आहे.

**१२.** वादीं–प्रतिवादींच्या कथनानुसार मूळपुरुष लक्ष्मण महादू नाटकर यांना शिवराम व दत्तु ही दोन मुले होती, शिवराम यांची साळुबाई ही पत्नी होती तर त्यांना जाईबाई, गंगुबाई, शांताबाई व सुभद्राबाई या चार मुली होत्या, शिवराम व साळुबाई यांना पुत्र संतान नव्हते, दत्तु लक्ष्मण नाटकर यांना बाळु, मारुती, पांडुरंग, अंकुश, लक्ष्मण व चंद्रकांत ही मुले होती, वादी क्र.३ ते १४ हे मयत जाईबाई व गंगुबाई यांची मुले असून प्रतिवादी क्र.४ ते २५ हे मयत बाळु, मारुती, पांडुरंग, अंकुश व चंद्रकांत यांचे वारस आहेत ही बाब वादातीत नाही. तसेच, दावा मिळकत ग्रा.पं. मिळकत नं.४६४ वगळता इतर सर्व मिळकतीं शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या वडिलोपार्जित होत्या व त्यामध्ये त्यांचा ८ आणे हिस्सा होता ही बाब देखील वादातीत नाही. त्याचबरोबर शिवराम लक्ष्मण नाटकर यांची पत्नी साळुबाई हिने तिचा

दिर नामे, दत्तु लक्ष्मण नाटकर यांचा मुलगा लक्ष्मण यास दि.२३.०७.१९७१ रोजीचे नोंदणीकृत दत्तकपत्राने दत्तक घेतले व सदर दत्तकपत्रास मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या चार मुली म्हणजे वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर या संमतीदर्शक पक्षकार होत्या याबाबत वाद नाही. वादीतर्फे निशाणी क्र.३ सोबत दाखल दि.२३.०७.१९७१ रोजीचे नोंदणीकृत दत्तक पत्राच्या प्रतीचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, साळुबाई शिवराम नाटकर यांनी लक्ष्मण यास दत्तक घेतले व त्यास वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर या देखील पक्षकार होत्या. यावरुन हे स्पष्ट होते की, सदर दत्तकपत्रास वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांची संमती होती, ज्याबाबत वादी क्र.१, २ व त्यांच्या मयत बहिणींची मुले यांनी आताही आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच, निशाणी क्र.३ सोबत दाखल दावा शेत मिळकतींचे सातबारा उतारे यांचे अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, दावा शेत मिळकतीं व ग्रा.पं. मिळकत क्र.१७९ यामध्ये मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांचा ८ आणे व त्यांचा भाऊ दत्तु लक्ष्मण नाटकर यांचा ८ आणे हिस्सा होता.

**१३.** वास्तविक, वादीं–प्रतिवादींमध्ये नातेसंबंधाबाबत, दावा मिळकतींचे मूळ मालक शिवराम व दत्तु असल्याबाबत व त्यांचे निम्मे–निम्मे हिस्से असल्याबाबत व मयत प्रतिवादी क्र.१ चे पती आणि प्रतिवादी क्र.२ व ३ चे वडील हे साळुबाई शिवराम नाटकर यांचे दत्तकपुत्र व वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांचा दत्तक भाऊ असल्याबाबत वाद नाही. तथापि, वादींनी दत्तक पत्रानुसार महसुल दप्तरी झालेल्या नोंदी व त्यांचा दावा मिळकतींमध्ये असणारा हिस्सा याबाबत हक्क सांगितलेला आहे. तथापि, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांनी दत्तकपत्रावेळी त्यांचा हिस्सा तोंडी सोडून दिल्याचे कथन केले आहे. तथापि, दि.२३.०७.१९७१ रोजीचे दत्तकपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांनी त्यांचा तोंडी हिस्सा सोडल्याबाबत नमूद नाही. सदरचा दस्त हा पूर्णपणे दत्तक घेतलेबाबतचा आहे. वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांनी त्यांचा हिस्सा सोडल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी क्र.२ व ३

यांनी दाखल केलेला नाही. वास्तविक, वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांची व मयत साळुबाई शिवराम नाटकर यांची नांवे शिवराम लक्ष्मण नाटकर यांचे मृत्यूनंतर त्यांच्या असणाऱ्या मिळकतींवर दि.०९.१२.१९६७ चे फेरफार नं.३१२६ प्रमाणे झालेचे दिसून येते. त्यामुळे, दावा शेत मिळकतीं या वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांना वारसाहक्काने आल्याचे स्पष्ट होते.

**१४.** वर चर्चिल्याप्रमाणे वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांनी दावा मिळकतींमधील हिस्सा सोडून दिल्याचे स्पष्ट होत नाही. तसेच, दत्तकपत्रानंतर फेरफार नं.५५७ हा दि.२५.०७.१९८४ रोजी झाला असून सदर फेरफारनुसार वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांची नांवे कमी केल्याचे दिसून येते. वास्तविक, वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांचा मयत शिवराम लक्ष्मण नाटकर यांच्या मिळकतींमध्ये तयार झालेला वारसा हक्क दत्तकपत्राने संपुष्टात येत नाही. परंतु, दावा शेत मिळकतीं दत्तकपुत्र लक्ष्मण शिवराम नाटकर याचे नांवे नोंदवून इतरांची नांवे कमी केल्याचे दिसून येते. सदर फेरफार नं.५५७ चे अवलोकनावरुन वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांना नोटीसा दिल्याचे अथवा त्यांनी हक्क सोडल्यामुळे त्यांची नांवे कमी केले असलेचे स्पष्ट होत नाही. वास्तविक, महसूल दप्तरी झालेल्या नोंदीवरुन ज्याचे नांव नोंद झाले आहे त्यास मिळकतीचे मालकी हक्क प्राप्त होत नाहीत हे कायद्याचे प्रस्तापित तत्व आहे. परिणामी, वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांचे वडिलार्जित मिळकतींमधील हक्क संपूष्टात आलेचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही. त्याचबरोबर जो व्यक्ती दत्तक जात असतो, त्याचे ज्या कुटूंबात जन्म झाला त्या कुटूंबाचे मिळकतीमधील सर्व अधिकार संपूष्टात येतात. तथापि, वादींनी कथन केल्याप्रमाणे दत्तु लक्ष्मण नाटकर यांच्या मृत्यूनंतर साळुबाई शिवराम नाटकर हिचा दत्तकपुत्र लक्ष्मण शिवराम नाटकर हा वारस होत नसताना वारस म्हणून नोंद झाल्याचे निशाणी क्र.३/१५ सोबत दाखल दि.१०.०२.१९८४ च्या फेरफार क्र.५०३ चे उताऱ्यावरुन स्पष्ट होते. यावरुन हे स्पष्ट होते की, दत्तकपुत्र लक्ष्मण शिवराम नाटकर यांनी दत्तक पत्रापुर्वीचे वडील दत्तु लक्ष्मण नाटकर व दत्तक

पत्रानंतरचे वडील शिवराम लक्ष्मण नाटकर या दोघांच्या मिळकतीमध्ये वारसाहक्काने नावे नोंद केली आहेत. त्यामुळे वादींचे कथन की, सदर लक्ष्मण शिवराम नाटकर याने महसुल अधिकाऱ्याशी संगनमत करुन ओळखीचा फायदा घेवून बेकायदेशीरपणे वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांची नावे कमी करुन स्वतःची नांवे दोन्हीकडील मिळकतींना करुन घेतली यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसून येते.

**१५.** त्याचबरोबर निशाणी क्र.३/१९ कडील फेरफार नं.११९० चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर यांचा दत्तक भाऊ लक्ष्मण शिवराम नाटकर यांचा दि.२८.०८.१९९२ रोजी मृत्यू झाल्यानंतर दावा शेत मिळकतींना मयत प्रतिवादी क्र.१ हिची पत्नी म्हणून व प्रतिवादी क्र.२ व ३ यांची मुले म्हणून नोंद झाली आहे. सदर नोंद ही वादींच्या अपरोक्ष झालेचे दिसून येते. वादींतर्फे दाखल निशाणी क्र.३/२५ व ३/२६ कडील दस्तऐवजांचे अवलोकनावरुन मयत प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दावा मिळकत गट नं.५०३ मधील हिस्सा प्रतिवादी क्र.४ ते २५ यांचे पूर्वजांना अनुक्रमे दस्त क्र.६६१/१९९२ व दस्त क्र.३२९/१९९५ प्रमाणे विकला असून ताबा दिलेचे स्पष्ट होते. तसेच, निशाणी क्र. ३/१७ व निशाणी क्र.३/१८ कडील फेरफारचे अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, सदर दस्तानुसार खरेदी घेणार म्हणजे प्रतिवादी क्र.४ ते २५ यांच्या पूर्वजांची नोंद अनुक्रमे फेरफार नं.१३३६ व १६५२ प्रमाणे झालेचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र.४ ते २५ यांनी हजर होवून वादींची कथने नाकारलेली नाहीत. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी महसुल दस्तऐवजाआधारे दावा शेत मिळकतींमध्ये व मालकी हक्क कथन केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, ग्रा.पं. मिळकत नं.४६४ ही मयत साळुबाई शिवराम नाटकर यांना त्यांचे माहेरहून मिळाली होती. तथापि, साळुबाई शिवराम नाटकर यांच्या मृत्यूनंतर ग्रा.पं. मिळकत नं.४६४ सदरी मयत प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावाची नोंद झाल्याचे निशाणी क्र.३/११ सोबत दाखल नमुना ८ उताऱ्यावरुन दिसून येते. यावरुन हे स्पष्ट होते की, सदर नोंद होतेवेळी देखील वादी क्र.१, २, मयत जाईबाई तुकाराम घाटे व मयत गंगुबाई शंकर खेडेकर हे वारस होत असताना नोंद केली गेली नाही. ग्रा.पं. मालमत्ता क्र.१७९ ही अद्यापी साळुबाई

शिवराम नाटकर हिचे नांवे नोंद असलेचे निशाणी क्र.३/१० कडील नमुना नं.८ चे उताऱ्यावरुन स्पष्ट होते. सदर मिळकतीवर अद्यापी साळुबाई शिवराम नाटकर यांचे वारसांची नोंद झाल्याचे दिसून येत नाही.

**१६.** वरिल विवेचनावरुन हे प्रथदर्शनी स्पष्ट होते की, दावा मिळकतींमध्ये वादींचा हिस्सा असतांना तो महसूल दप्तरी झालेल्या नोंदीवरुन, कोणत्याही दस्ताशिवाय त्यांची नांवे कमी केली आहेत व नोंदविली गेली नाहीत. त्यामुळे प्रथदर्शनी वादींचा वडिलार्जित दावा मिळकतींमध्ये हिस्सा असलेचे स्पष्ट होते. तसेच, मयत प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दावा मिळकतीपैकी गट नं.५०३ मधील हिस्सा दोन वेगवेगळ्या खरेदीखताआधारे प्रतिवादी क्र.४ ते २५ यांचे पूर्वज यांना हस्तांतरित केलेचे स्पष्ट होते. वादीं हे दावा मिळकतींमध्ये त्यांचा असणारा हिस्सा ठरवून वाटप व परिणामी कब्जा व झालेले खरेदी दस्त व महसूल नोंदी त्यांच्यावर बंधनकारक नाहीत अशी मनाई मागत आहेत. दावा मिळकतींच्या महसूल दप्तरी प्रतिवादी क्र.२ ते २५ यांची नांवे वारस म्हणून नोंद असलेचे स्पष्ट होते. प्रतिवादींनी मुदतीची बाधा व हिस्सा सोडून दिल्याचे कथन केले असले तरी सदर बाबीं या पुराव्याअंती स्पष्ट होणार आहेत. परंतु, तोपर्यंत म्हणजे दाव्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होईपावेतो दावा मिळकतींमधील हक्क अधिकार अबाधित ठेवणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतींमध्ये त्यांचे नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून तिऱ्हाईत इसमांचे कोणत्याही प्रकारे हक्क निर्माण केल्यास, ग्रामपंचायत मिळकतीचे स्वरुप बदलल्यास, त्यामध्ये बांधकाम केल्यास गुंतागूंत निर्माण होणार आहे व वादींचे मुख्य मागणीस बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही व कार्यवाहीची विविधता वाढणार आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादी क्र.२ ते २५ यांनी दावा शेत मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत इसमांचे हक्क निर्माण करु नयेत, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी ग्रामपंचायत मिळकतीचे स्वरुप बदलून त्यामध्ये बांधकाम करु नये म्हणून त्यांना प्रतिबंधित करणे यथोचित आहे. तसे न केल्यास वादींचे नुकसान होणार आहे. परिणामी, सकृतदर्शनी केस, नुकसानीचे तत्व व सोईचा समतोल वादींचे बाजूने आहे. त्यामुळे, वादीं प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त मनाई मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.५ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे

आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादी क्र.२ ते २५ यांनी दावा शेत मिळकतीं गट नं.३७६, ३७७, ३९७, ३७३, ५०३, ३७५ या कोणासही हस्तांतरित अगर विक्री करु नये, दावा मिळकतीमध्ये कोणत्याही तिऱ्हाईत इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत व दावा मिळकतींवर बोजा निर्माण करु नये अशी तुर्तातूर्त मनाई देणेत येते.

३. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी ग्रामपंचायत मिळकत नं.४६४ व १४९ कोणासही हस्तांतरित अगर विक्री करु नये, त्यामध्ये तिऱ्हाईत इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत, स्वरुप बदलून बांधकाम करु नये अशी तुर्तातूर्त मनाई देणेत येते.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

MOTE TUKARAM PATANG
Digitally signed by MOTE TUKARAM PATANG
Date: 2026.01.20 14:54:08 +0530

**( तुकाराम प. मोटे )**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सासवड, जि. पुणे.

दिनांकः– १६/०१/२०२६.
सासवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर कथन करतो की, या आदेशाच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुरांशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :: | संतोष किशनराव पांचाळ, लघुलेखक (श्रेणी–III) |
| **न्यायालयाचे नाव** | :: | **श्री. तुकाराम प. मोटे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व<br>न्यायदंडाधिकारी वर्ग–१, सासवड, जि. पुणे. |
| आदेशाची तारीख | :: | १६/०१/२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | :: | २०/०१/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | २०/०१/२०२६ |